# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३५२**

**अपिलार्थी श्री. विश्वनाथ कमलाकर कोळी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**

ट्रॉम्बे विभाग, प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-६)**

ट्रॉम्बे विभाग, आर.सी.एफ.पोलीस ठाणे, पहिला मजला
आर.सी.मार्ग, माहुल रोड, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
सहाय्यक जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०३.२०२१ | २०.०४.२०२१ | २८.०४.२०२१ | २१.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १४.०१.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये माहिती देण्यास टाळाटाळ, विलंब केला आहे व दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.०४.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २१.१२.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. २२.०३.२०२१ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉबे पोलीस ठाणे, यांनी दिनांक २४.०४.२०२१ रोजी श्री. विनायक सुधाकर कोळी यांच्या विरोधात आलेल्या तक्रार अर्जावर तक्रार अर्ज, पंचनामा, जबाब या संदर्भात केलेल्या चौकशीची संपूर्ण दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत मिळावी, अशी माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २०.०४.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही ज्या तक्रार अर्जाशी संबंधित आहे ते संबंधीत अर्जदार यांनी स्वत: बद्दलची व या अर्ज चौकशी संबंधातील कागदपत्रांची माहिती कोणालाही देऊ नये, असे लेखी स्वरुपात पत्र सादर केले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मागणी केलली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ च्या तरतुदीनुसार हरकत घेतल्यामुळे अर्जदार यांना देता येत नाही, असे उत्तर दिले आहे.

..२/-

अपिलार्थी यांनी दि. २८.०४.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीशी आम्ही सहमत नाही. सदर प्रकरणात अपिलार्थी हे गैरतक्रारदार असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या विरोधात करण्यात आलेला अर्ज व चौकशी अहवालाची प्रत १० दिवसात अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

प्रथम अपिलाच्या आदेशानंतर दिनांक ०८.०१.२०२२ चे पत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या विरोधात करण्यात आलेला अर्ज व चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन दिलेली आहे आहे असे पत्र अभिलेखावर उपलब्ध आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सहाय्यक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांना अद्यापही संपूर्ण माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींना उपलब्ध माहिती दिलेली आहे. त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यामुळे काही माहिती दिलेली नव्हती. तथापि, आता ती अपिलार्थी यांना देता येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, दिनांक २१.१२.२०२१ रोजी झालेल्या प्रथम अपील सुनावणीमध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे विरोधात करण्यात आलेला अर्ज व चौकशी अहवालाची प्रत १० दिवसात अपिलार्थींना देण्याचे आदेश दिले होते. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून त्यांचे म्हणणे आहे की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्वरीत माहिती पुरविण्यात येईल असे नमूद केले. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

१. **सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे विरोधात करण्यात आलेला अर्ज व चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थींना सात दिवसांचे आत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

२. **अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास
23-4-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : २३.०४.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**